विभाग प्रमुख, अणुविद्युत अभियांत्रिकी, शासकीय तंत्रनिकेतन, महाराष्ट्र तंत्रनिकेतन शिक्षक सेवा गट-अ या पदावर नामनिर्देशनाने नियुक्तीबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांकः ससेनि-३२१८/प्र.क्र.०८/१८/तांशि -७
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक:- १६ मे, २०१८

संदर्भ : १) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक : एसआरव्ही-२०१५/ प्र.क्र.१५६/ कार्या.१२, दि.८ मे, २०१५ व शासन अधिसूचना दि.१५ जून, २०१७.
२) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे क्र.१५ (१) (७४)/१७४११/सात-अ, दि. २० जुलै, २०१७ व दि.२९ नोव्हेंबर, २०१७ चे पत्र.
३) या विभागाचे पत्र क्र.ससेनी-३२१६/प्र.क्र.२३३/१६/तांशि-७, दि. ०७ ऑक्टोबर, २०१७.

प्रस्तावना :

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने संदर्भाधीन क्र.२ येथील दि.२० जुलै, २०१७ च्या पत्राद्वारे ०१ उमेदवारांची विभाग प्रमुख, अणुविद्युत अभियांत्रिकी, शासकीय तंत्रनिकेतन, महाराष्ट्र तंत्रनिकेतन शिक्षक सेवा गट-अ या पदावर नियुक्तीसाठी शिफारस केली. सदर शिफारसकृत उमेदवाराने नियुक्ती न स्विकारल्याने त्या उमेदवाराच्या बदल्यात आयोगाकडून प्रतिक्षायादीतील उमेदवाराची मागणी संदर्भाधीन क्र.३ येथील पत्राद्वारे करण्यात आली.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने उपरोक्त मागणीस अनुसरून संदर्भाधीन क्र.२ येथील दि.२९ नोव्हेंबर, २०१७ रोजीच्या पत्रान्वये विभाग प्रमुख, अणुविद्युत अभियंत्रिकी, शासकीय तंत्रनिकेतन, गट-अ या पदावर श्री. कानडे सुधीर सिध्देश्वर या उमेदवाराची प्रतिक्षायादीतुन गुणवत्ताक्रमानुसार शिफारस केली आहे. सदर उमेदवारास नियुक्ती देण्याचे शासन विचाराधीन होते.

शासन निर्णय :

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने संदर्भाधिन दि. २९ नोव्हेंबर, २०१७ च्या पत्राव्दारे ०१ उमेदवारांची प्रतिक्षायादीतुन गुणवत्ताक्रमानुसार विभाग प्रमुख, अणुविद्युत अभियांत्रिकी, शासकीय तंत्रनिकेतन, महाराष्ट्र तंत्रनिकेतन शिक्षक सेवा गट-अ या पदावर नियुक्तीसाठी शिफारस केली आहे. सदर उमेदवाराची खालील तक्त्यात नमुद त्यांच्या नावासमोर रकाना क्र.०५ मध्ये दर्शविलेल्या ठिकाणी ते ज्या दिनांकास त्यांच्या पदाचा कार्यभार स्विकारतील त्या दिनांकापासून ०२ वर्षांच्या परिविक्षा कालावधीसाठी स्थानापन्न नियुक्ती करण्यात येत आहे. त्यांचा गुणवत्ता क्रमांक श्री. अनिल दिनकर कुंभार यांच्या नंतर व श्री.लामतुरे दिलिप किशनराव यांच्या आधी राहील.सदर आदेश सक्षम प्राधिका-याच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहेत.

अ. क्र.	आयोग पुरस्कृत उमेदवाराचे नांव	आयोगाने शिफारस केलेला प्रवर्ग	वाटप केलेला महसूली विभाग	नियुक्तीचे ठिकाण	अभिप्राय
१	२	३	४	५	६
१	श्री.कानडे सुधीर सिध्देश्वर	खुला	औरंगाबाद	शासकीय तंत्रनिकेतन, अंबड	**उस्मानाबाद येथील त्यांच्या वास्तव्याच्या कालावधीतील चारित्र्य व पूर्वचारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र सादर करण्याच्या अटीच्या अधिन राहून.**

०२. उपरोक्त उमेदवारास संबंधित वैद्यकीय मंडळाने वैद्यकीय दृष्टया शासकीय सेवेकरीता पात्र ठरविले आहे. तशी नोंद त्यांच्या सेवापुस्तकात घेण्यात यावी.

०३. तसेच, उपरोक्त उमेदवाराचे नावासमोर नमुद केल्याप्रमाणे चारित्र्य व पुर्व चारित्र्य पडताळणी अहवाल अद्याप अप्राप्त आहेत. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.चापअ-१००८/ प्र.क्र.२१४/०८/१६-अ, दि.०९ जानेवारी, २००९ नुसार चारित्र्य व पुर्व चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र नियुक्ती आदेशापासून सहा महिन्यांच्या आत सादर करणे आवश्यक आहे. जर सदर प्रमाणपत्रे त्यांनी विहीत मुदतीत सादर केले नाही तर उक्त कालावधी संपताच त्यांची सदर पदावरील नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल. सदर उमेदवारांची नियुक्ती ही निव्वळ तात्पुरत्या स्वरूपाची असून त्यांच्या चारित्र्य पडताळणीचा अहवाल असमाधानकारक असल्याचे निर्दशनास आल्यास त्यांची नियुक्ती कोणतेही कारण न देता एक महिन्याची नोटीस देवून समाप्त करण्यात येईल.

०४. उपरोक्त उमेदवाराची, विभाग प्रमुख, अणुविद्युत अभियांत्रिकी, शासकीय तंत्रनिकेतन, महाराष्ट्र तंत्रनिकेतन शिक्षक सेवा, गट-अ या पदावर ते प्रत्यक्ष हजर झाल्याच्या दिनांकापासून, नामनिर्देशनाने, निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून नियुक्ती करण्यात येत आहे:-

१) सदर उमेदवाराची वेतनश्रेणी रु. ३७,४००-६७,०००/- या पे बँड व उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क्र. एसपीसी-२०१०/(३४/१०)/तांशि-२, दि. २०/०८/२०१० मध्ये नमुद एजीपी मध्ये राहील.

२) सदर वेतनश्रेणीव्यतिरिक्त शासन वेळोवेळी ठरवेल त्या दराने महागाई भत्ता, घरभाडे भत्ता व स्थानिक पूरक भत्ता अनुज्ञेय राहील.

३) सदर उमेदवाराचे प्रथम वेतनवाढ परिविक्षा कालावधीतील एक वर्ष पूर्ण झाल्यानंतर देण्यात येईल व त्यानंतरची वेतनवाढ परिविक्षा कालावधी समाधानकारकरीत्या पूर्ण केल्यानंतर मिळेल.

४) सदर उमेदवाराचे परिविक्षा कालावधीतील काम किंवा वर्तणूक अयोग्य, अपेक्षित दर्जाची नसल्यास अथवा असमाधानकारक आढळल्यास त्यांची सेवा कोणतीही पूर्वसूचना न देता समाप्त करण्यात येईल अथवा सेवेतून कमी करण्यास ते पात्र ठरतील.

५) सदर उमेदवाराची नियुक्ती सरळ सेवाप्रवेश नियुक्तीसाठी विहीत केलेल्या नियमाच्या अधीन राहून ते यापूर्वी हिंदी व मराठी भाषेच्या परीक्षा उत्तीर्ण झालेले नसल्यास किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसल्यास त्या परीक्षा त्यांना विहीत मुदतीत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. तसे न झाल्यास त्यांची वेतनवाढ रोखून ठेवण्यात येईल.

६) सदर उमेदवाराचे वेतन महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन), नियम -१९८१ मधील तरतुदींनुसार निश्चित करण्यात यावे.

७) संबंधित उमेदवारानी त्यांच्या नावासमोर निर्देशिलेल्या पदावर आदेशाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत तात्काळ रुजु व्हावे. सदर विहीत मुदतीत जर त्यांनी नियुक्ती स्विकारली नाही तर आयोगाने घेतलेल्या परीक्षेत त्यांनी मिळविलेल्या गुणवत्ताक्रमानुसार त्यांना अनुज्ञेय असलेली ज्येष्ठता मिळणार नाही शिवाय प्रस्तुत नियुक्तीच्या संदर्भात त्यांनी वरील मुदतीत शासनास काहीही कळविले नाही तर, कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांच्या नियुक्तीचे सदरचे आदेश रद्द करण्यात येतील.

८) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.अंनियो-१००९/प्र.क्र.३२/सेवा-४, दि. १८/०८/२००९ मधील तरतुदीनुसार दि.१ नोव्हेंबर,२००५ पूर्वी शासन सेवेत निवृत्तीवेतनार्ह आस्थापनेवर कार्यरत असलेल्या शासकीय कर्मचा-यांने त्याच किंवा अन्य विभागातील निवृत्तीवेतनार्ह आस्थापनेच्या पदावरील नियुक्तीसाठी दि. १ नोव्हेंबर,२००५ पूर्वी किंवा त्यानंतर अर्ज केला असेल आणि त्याला दि. १ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर नवीन पदावर नियुक्त करण्यात आले असेल तर अशा प्रकरणी शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक: अंनियो-१००६/८७/सेवा-४, दि.१२ जानेवारी, २००७ मधील (i) ते (iv) येथे नमूद केलेल्य सर्व अटींची पूर्तता झाल्यास संबंधीत शासकीय कर्मचा-यास महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन), नियम,१९८२ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू ठरतील.दि. १८/०८/२००९ च्या परिपत्रकात नमूद (i) ते (iv) येथील सर्व अटींची पूर्तता

ज्या प्रकरणी होत नसेल, अशा शासकीय कर्मचा-यास नवीन राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू ठरतील.

९) सदर उमेदवाराचे सेवानिवृत्तीचे वय प्रचलित नियमानुसार राहील.

१०) उमेदवारास नियुक्तीच्या ठिकाणी उपस्थित राहण्यासाठी प्रवासभत्ता देण्यात येणार नाही.

११) सदर उमेदवाराने नोकरी सोडण्यापूर्वी शासनास एक महिन्याची पूर्वसुचना देणे अथवा एक महिन्याचे वेतन देणे आवश्यक आहे.

०६. सदर नियुक्ती उमेदवाराने सादर केलेल्या प्रमाणपत्रांच्या सत्यासत्यतेवर अवलंबुन राहील. सदर प्रमाणपत्र नियुक्तीनंतर खोटे अथवा बनावट आढळल्यास सदर उमेदवाराची नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

०७. हे आदेश प्राप्त होताच संबधित उमेदवाराने नियुक्तीच्या ठिकाणी हजर व्हावे व त्याबाबतचा अहवाल संबधित संस्थाप्रमुखाकडे सादर करावा. संस्थाप्रमुखांनी त्याबाबतचा अहवाल संचालकामार्फत शासनास सादर करावा.

०८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५१६१६३४०४३६०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sudhir Jaya Shetty

Digitally signed by Sudhir Jaya Shetty
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=72ea277025fdf5a4898b244953b82406eea05963bc456f1e1e8621e5917d8305, serialNumber=e9d37d499a521b728aeb3dc8ec38b759420308b9fd7816002b4af0ffbf1111d7, cn=Sudhir Jaya Shetty
Date: 2018.05.16 16:32:11 +05'30'

(सुधीर जया शेट्टी)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

श्री. कानडे सुधीर सिध्देश्वर, घर क्र.२६/१८५०, रो हाऊस नं.ए-६, सीटीएस क्र.९२०६, बँक कॉलनी, सरस्वती हायस्कूलजवळ, उस्मानाबाद, जि. उस्मानाबाद, पिन-४१३५०१ (नोंदणीकृत डाकेने) (e-mail द्वारे)

प्रत,

१. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राव्दारे),
२. संचालक, तंत्रशिक्षण, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
३. मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा.राज्यमंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
६. सहसंचालक तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, औरंगाबाद (तंत्र शिक्षण संचालनालयामार्फत),
७. प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, अंबड (तंत्र शिक्षण संचालनालयामार्फत),
(वरील उमेदवारांना रुजू करुन घेताना त्यांच्या शैक्षणीक तसेच इतर मूळ प्रमाणपत्रांची तपासणी करुन संस्थाप्रमुखांनी स्वत: खात्री करावी व सदर उमेदवारांना हजर करुन घ्यावे व त्याबाबतचा अहवाल संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई यांच्यामार्फत शासनास तात्काळ सादर करावा. तसेच संबंधित संस्थाप्रमुखांनी या आदेशातील ज्या उमेदवारांची नियुक्ती अटीच्या अधिन राहुन केली आहे त्या उमेदवारांकडून विहीत मुदतीत या अटीची पुर्तता करुन घेवून त्याबाबतचा कार्यपूर्तता अहवाल संचालक, तंत्रशिक्षण यांच्यामार्फत शासनास तात्काळ सादर करावा.)
८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
९. जिल्हा कोषागार अधिकारी, जालना (तंत्र शिक्षण संचालनालयामार्फत),
१०. निवड नस्ती (तांशि-७).